# प्रेसनोट

## वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हेशाखा, पुणे शहर कडून ०१ देशी बनावटीचे पिस्तूल व ०२ जिवंत काडतुसे जप्त.

दिनांक ०१/१०/२०१८ रोजी वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर चे पथकाचे **पोलीस कर्मचारी विशाल शिर्के** यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम किनारा हॉटेल, वनाज कंपनी समोर, पौड रोड, पुणे येथे देशी बनावटीचे पिस्तूल घेऊन येणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळताच वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हे शाखेचे प्रभारी पो.निरी. श्री. दिपक लगड यांनी सदरची बातमी मा. वरिष्ठांना कळविली. त्याबाबत सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. भानुप्रताप बर्गे यांनी दिलेल्या सुचनां व मार्गदर्शनाप्रमाणे वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हेशाखेचे पो.निरी. दिपक लगड यांचे नेतृत्वाखाली स्टाफने किनारा हॉटेल, वनाज कंपनी समोर, पौड रोड, पुणे येथे सापळा रचून बातमीतील वर्णनाचा इसम नामे आशिष विनायक महाडीक, वय-३१ वर्षे, रा.८८/२/३, वृंदावन कॉलनी, महालक्ष्मी निवास, आझादनगर, कोथरुड, पुणे यास पकडले असता त्याचेकडे ०१ देशी बनावटीचे पिस्तुल, ०२ जिवंत काडतूसे असा एकुण किं.रू. २५,३००/- रू. चा माल बेकायदेशीररित्या विनापरवाना, अनाधिकृतपणे जवळ बाळगला असताना मिळून आला. त्यास मालासह ताब्यात घेवून त्याचे विरूध्द कोथरुड पो.स्टे. गुन्हा रजि.नं.३०१/२०१८ आर्म ॲक्ट क. ३(२५) व मुंबई पोलीस ॲक्ट क. ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील कारवाईत वाहनचोरी विरोधी पथकाकडील कर्मचारी सुनिल पवार, अब्दुलकरीम सय्यद, गणेश साळुंके, सुहास कदम, शंकर संपते, मोहन येलपले, विशाल शिर्के यांनी सहभाग घेतला आहे.